मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी धोरण ठरवा!

## भाजपा नेते आमदार महेश लांडगे यांची मागणी : नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये लक्ष वेधले

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील मोकाट कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी शास्त्रीय निकषांवर आधारित तर्कशुद्ध आणि न्याय्य धोरण अत्यावश्यक आहे. महाराष्ट्रात "झीरो बाय ३०" चे उद्दीष्ट साध्य करायचे असेल, तर अँटिरेबीज लस आणि रेबीज ऍंटीसिरमच्या उपलब्धतेची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचली पाहिजे, अशी आग्रही मागणी महायुती सरकारकडे केली आहे. यावर निश्चितपणे सकारात्मक पावले उचलावीत, अशी मागणी भाजपा नेते आमदार महेश लांडगे यांनी केली.



नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनामध्ये पिंपरी-चिंचवडसह राज्यातील प्रमुख शहरांमध्ये भेडसावणारा मोकाट कुत्र्यांच्या प्रश्नाकडे आमदार लांडगे यांनी महायुती सरकारचे लक्ष वेधले.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, पुणे, पिंपरी-चिंचवडसह संपूर्ण महाराष्ट्र किंबहुना भारतात मोकाट कुत्र्यांची समस्या गंभीर होत आहे. एका सर्व्हेक्षणानुसार, भारतात दरवर्षी 'रेबीज'मुळे २० हजार नागरिकांचा मृत्यू होतो. म्हणजे दर अर्ध्या तासाला एका व्यक्तीला रेबीजमुळे आपला जीव गमवावा लागतो. रेबीज व्यतिरिक्त इतर अनेक प्राणिजन्य (झुनोटिक) रोगांचा प्रसारही मोकाट कुत्र्यांमुळे होतो आहे.

त्यामुळे शहरी, निमशहरी आणि ग्रामीण भागांमध्ये मोकाट कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी एकच ढोबळ धोरण असून चालणार नाही. इकॉलॉजी, सार्वजनिक आरोग्य शास्त्र, समाजशास्त्र इत्यादी विषयांतील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली हे धोरण ठरवले पाहिजे. यासाठी आवश्यक संशोधन प्रकल्प राबवले पाहिजे, अशी मागणीही आमदार लांडगे यांनी केली आहे. यावर राज्य शासनाकडून ठोस उपाययोजना केल्या जातील, अशी अपेक्षा आहे.

> आगामी २०३० पर्यंत जगभरात डॉग स्ट्रेंन रेबीजमुळे मरणाऱ्या लोकांची संख्या शून्यावर आणण्याचा द्दढ निश्चय जागतिक आरोग्य संघटनेने केला आहे. त्यासाठी भारतात "झीरो बाय ३०" चे उद्दिष्ट यशस्वी होणे आवश्यक आहे. सध्यस्थितीला भारतात दरवर्षी २ कोटी लोकांना मोकाट कुत्रे चावतात. त्यापैकी २० हजार लोक रेबीजच्या संसर्गाने जीव गमावतात. रेबीज १०० टक्के प्राणघातक आहे. जोपर्यंत मोकाट कुत्र्यांची संख्या नियंत्रणात येत नाही. तोपर्यंत भारतात डॉग- स्ट्रेन रेबीजचा प्रादुर्भाव रोखणे शक्य नाही. त्यामुळे राज्य सरकारने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी आग्रही मागणी विधानसभा सभागृहात केली. त्यावर सकारात्मक कार्यवाही होईल, अशी अपेक्षा आहे.
>
> - महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

## चिंचवडमध्ये हजारो मोरया भक्तांच्या उपस्थितीत अथर्वशीर्ष पठण संपन्न

### चिंचवड देवस्थान ट्रस्ट, संस्कृती संवर्धन विकास महासंघ व स्थानिक शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

ओम नमस्ते गणपतये... ओम गणपतये नमः ... 'मोरया, मोरया'च्या जयघोषाने हजारो मोरया भक्तांनी पहाटे एकत्र येत अथर्वशीर्ष पठणातून गणरायाला नमन केले. श्रीमन् महासाधू श्री मोरया गोसावी महाराज यांच्या ४६३ व्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त सामूहिक अथर्वशीर्ष पठण भक्तिमय वातावरणात संपन्न झाले.



चिंचवड देवस्थान ट्रस्ट, संस्कृती संवर्धन विकास महासंघ व स्थानिक शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने या अथर्वशीर्ष पठणचे आयोजन करण्यात आले होते. गणेश नामाचा जयघोष करीत महिलांनी व अनेक शाळकरी मुलांनी सकाळच्या मंगल समयी प्रसन्नतेची अनुभूती दिली. अथर्वशीर्ष पठण महिलांसह पुरुषांनी आणि शाळकरी मुलांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत उदंड प्रतिसाद दिला. पारंपरिक पेहरावातील भक्तांनी सकाळपासूनच अथर्वशीर्ष पठणासाठी गर्दी केली होती. महिलांनी ॐकार जप आणि अथर्वशीर्षाची ११ आवर्तने करीत गणरायाला नमन केले.

या प्रसंगी आयोजित अथर्वशीर्ष पठण कार्यक्रमाने भक्तांच्या मनात अध्यात्मिक उर्जा निर्माण केली. कार्यक्रमाची सुरुवात मंत्रमुग्ध करणाऱ्या शंखनादाने झाली. त्यानंतर हिंदू धर्माच्या महत्त्वावर विचारमंथन करणारे व्याख्यान देण्यात आले. अथर्वशीर्ष पठण सोहळ्यात अनेक वयोगटातील भाविकभक्तांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी श्रींची आरती करण्यात आली आणि पुन्हा शंखनादाने या मंगल सोहळ्याची सांगता झाली.

या अध्यात्मिक कार्यक्रमामुळे भाविकांना भक्तीमय वातावरणाचा अनुभव मिळाला. चिंचवड देवस्थान ट्रस्ट आणि संस्कृती संवर्धन विकास महासंघ व स्थानिक शाळा समन्वयामुळे हा कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न झाला.

## डी.पी.रस्त्याच्या कामाची माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांच्याकडून पाहणी

### नाना काटे यांनी महापालिकेकडे या कामासंदर्भात सातत्याने पाठपुरावा केला होता.

**पिंपरी | प्रतिनिधी**

प्रभाग क्र.२८ पिंपळे सौदागर येथील संरक्षण खात्याच्या ताब्यात असलेल्या क्रिस्टल हॉटेल, ट्रायोज सोसायटी ते नॅचरल आइस्क्रीम कॉर्नर जोडला जाणाऱ्या रस्त्याच्या संरक्षण भिंतीच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. माजी विरोधी पक्षनेता विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी महापालिकेकडे या कामासंदर्भात सातत्याने पाठपुरावा केला होता. या कामाची आज महापालिकेचे संबंधित अधिकारी, स्थापत्य विभागाचे डेप्युटी सुनील शिंदे, क्लीम्सी कन्स्ट्रक्शनचे हबीब, सल्लागार प्रतिनिधी यांच्यासोबत पाहणी केली.



हा रस्ता १८ मीटर रुंद आणि ९२० मीटर लांबीचा 'डीपी' रस्ता आहे. या रस्त्याच्या निर्मितीसाठी १४ कोटी ८२ लाख ८९ हजार रुपयांची निविदा मंजूर करण्यात आली आहे. संरक्षण खात्याच्या ताब्यात असलेल्या जागेचे महापालिकेकडे हस्तांतरण झाले असून दोन्ही बाजूंच्या समन्वयामधून हे काम शक्य झाले आहे.

या रस्त्यामुळे नाशिक फाटा ते जगताप डेअरी या बीआरटी मार्गालगतच्या स्वराज गार्डन, क्रिस्टल हॉटेल, योगा पार्क, आणि ट्रायोज सोसायटीकडे जाणाऱ्या मार्गावरील वाहतूक कोंडी कमी होणार आहे. हा रस्ता नाशिक फाट्याकडून कोकणे चौकाकडे जाणाऱ्या मार्गावरील वाहतुकीचा ताण कमी करणारा आहे. तसेच काटे वस्ती, गोविंद गार्डन आणि ट्रायोज सोसायटीकडे वाहने सहज जाऊ शकतील. त्यामुळे वाहतूक सुरळीत होईल आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळेल. या रस्त्यामुळे परिसरातील सुमारे पंचवीस हजार नागरिकांना लाभ होणार आहे. नाशिक फाटा, कोकणे चौक आणि गोविंद गार्डन परिसरातील वाहतूक कोंडी कमी होणार आहे.

# पुणे पुस्तक महोत्सव बनावा 'सामाजिक महोत्सव'


**पुण्याचे नाव होते तेव्हा महाराष्ट्राचे नाव होते. महाराष्ट्राचा लौकिक वाढतो तेव्हा देशाचा लौकिक वाढतो; अशी अपेक्षा केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी व्यक्त केली.**

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्रात पुण्याचे स्थान महत्त्वाचे आहे. पुण्याचे नाव होते तेव्हा महाराष्ट्राचे नाव होते. महाराष्ट्राचा लौकिक वाढतो तेव्हा देशाचा लौकिक वाढतो. पुणे पुस्तक महोत्सव येत्या काळात हा एक सामाजिक महोत्सव व्हावा, अशी अपेक्षा केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी व्यक्त केली.

राष्ट्रीय पुस्तक न्यासतर्फे पुणे पुस्तक महोत्सवाला प्रधान यांनी मंगळवारी भेट दिली. एमबीटीचे संचालक युवराज मलिक, पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे, संयोजन समितीचे सदस्य प्रसेनजित फडणवीस, डॉ. आनंद काटीकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नियामक परिषदेचे अध्यक्ष प्रमोद रावत या वेळी उपस्थित होते.

प्रधान म्हणाले, की हजारो वर्षांची परंपरा असलेल्या मराठीला अभिजात भाषेचा दर्जा केंद्र सरकारने दिला आहे, ही मराठीजनांसाठी महत्त्वाची घटना आहे. भारतीय संस्कृतीत पुण्याचे स्थान महत्त्वाचे आहे. संस्कृती चिरंतन राहण्यात भाषा, संस्कृतीचे महत्त्वाचे असते. त्यासाठी पुस्तकाचे महत्त्व मोठे आहे. समाजजीवनाची निरंतरता पुस्तक आहे. आई-वडिलांनंतर पुस्तक हा व्यक्तीचा सोबती असतो. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात भारतीय भाषांना महत्त्व देण्यात आले आहे. देशात २६ भाषा अनुसूचित आहेत. नवजात बालकाच्या कानावर मातृभाषेतील शब्द पडतात, त्यानंतर ते मुल मातृभाषेत बोलू, लिहू, वाचू लागते. या प्रवासात पुस्तक महत्त्वाचे ठरते. पुणे पुस्तक महोत्सवाला इतक्या मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळतो ही फारच मोलाची बाब आहे.



### पाच लाख नागरिकांची भेट

» पुणे पुस्तक महोत्सवाला नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिला असून, पहिल्या पाच दिवसांत पाच लाखांच्या आसपास नागरिकांनी भेट दिली आहे. या भेटीत नागरिकांनी पाच लाखांपेक्षा अधिक पुस्तके खरेदी केली. त्यामुळे यंदाचा पुणे पुस्तक महोत्सव नागरिकांच्या चांगला पसंतीस उतरला आहे, अशी माहिती पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी दिली. महोत्सवात २२ भारतीय भाषांमधील सुमारे १२ लाख पुस्तके खरेदीसाठी उपलब्ध आहे. तीन भव्य दालनांमध्ये ६०० पेक्षा अधिक स्टॉल्स आहेत.

### ग्रंथपालांचे संमेलन उत्साहात

» पुणे शहरातील विद्यापीठ, महाविद्यालयीन, शालेय आणि सार्वजनिक ग्रंथालयाच्या ग्रंथपालांचे संमेलन उत्साहात पार पडले. या संमेलनाला राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे अध्यक्ष मिलिंद मराठे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाचे निवृत्त प्राध्यापक डॉ. राजेंद्र कुंभार हे उपस्थित होते. राष्ट्रीय पुस्तक न्यासाने वाचनासंबंधीचा अभ्यासक्रम सुरू करावा, असे आवाहन डॉ. कुंभार यांनी केले. न्यासाचे अध्यक्ष मिलिंद मराठे यांनीही ग्रंथपालांनी वाचनासंबंधी अधिकाधिक प्रयत्न करावेत आणि त्यासाठी राष्ट्रीय पुस्तक न्यास त्यांना कायम सहकार्य करेल, अशी ग्वाही दिली. संचालक मलिक (निवृत्त) यांनीही ग्रंथपालांनी प्रशासकीय कामात न अडकता विद्यार्थ्यांना त्यांच्यापर्यंत जाऊन वाचन का करायचे, कसे करायचे, हे सांगणे आवश्यक असल्याचे सांगितले. जयकर ग्रंथालयाचे संचालक डॉ. संजय देसले यांनी प्रास्ताविक केले. शालेय ग्रंथपाल संघटनेचे अध्यक्ष प्रदीप बागल यांनी आभार मानले.

# पब संस्कृतीला विरोध नाही... परंतु, निर्बंध आवश्यकच

**पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांचे वक्तव्य**

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील पब संस्कृतीला पोलिसांचा विरोध नाही. परंतु, नियमांचे पालन केले जाणे आवश्यक आहेत. त्याकरिता पबवर निर्बंध आवश्यक असल्याचे मत पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी व्यक्त केले. पोलीस आरोग्य मित्र फाउंडेशन आणि सुभाषनगर माडीवाले वसाहत गणेशोत्सव मंडळाच्या वतीने आयोजित 'कॉफी विथ सीपी' वार्तालाप कार्यक्रमात ते बोलत होते. पब चालकांनी नियम पाळले नाही तर आम्ही केवळ कारवाईच करणार नाही तर त्यांना आयुष्यभर धडा मिळेल, असा आर्थिक दणका देऊ", असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

आयुक्तांनी पुण्याच्या सांस्कृतिक वारशाविषयी देखील महत्वपूर्ण वक्तव्य केले. ते म्हणाले, पुण्यासारख्या शहरात काम करण्याची संधी मिळते यामध्ये आनंद आहे. विविध ठिकाणी २८ वर्षे काम केले, मात्र खरा गणपती उत्सव पुण्यातच अनुभवला. शहराला ड्रग्समुक्त करण्याचा निर्धार मनात ठेवून काम सुरू केल्यानंतर पुण्यातील ३६०० कोटींच्या ड्रग रॅकेटचा कशा पद्धतीने छडा लावला याबाबतचा अनुभव त्यांनी उपस्थितांसमोर मांडला.

ते पुढे म्हणाले, "पोर्शे अपघात प्रकरणानंतर पालकांना असा धडा मिळाला आहे की, मुले आता घरी गाडी मागण्यासही धजावत नाही. कारण त्यांना माहिती आहे की, एका मुलाने दोघांचा जीव घेतला आणि त्याचे आईवडील आज जेलमध्ये आहेत. कायद्याच्या विरोधात गेला की काही खैर नाही हे त्यांनाही कळून चुकले आहे."

सायबर गुन्हे रोखण्यासाठी पुण्यात सुसज्ज प्रयोगशाळा व्हावी यासाठी देखील पाठपुरावा सुरू आहे. पुण्यातील ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा, महिलांची सुरक्षा यांच्या दृष्टीने आम्ही पावले उचलत आहोत. बोपदेव येथील बलात्काराच्या घटनेनंतर शहरातील २२ टेकड्यांवर सुरक्षेच्या योजनेच्या अनुषंगाने काम सुरु असल्याची माहिती त्यांनी दिली.



# शहरातील पशुगणना 28 फेब्रुवारीपर्यंत

**त्याचे कामकाज ॲनिमल हेल्थ ऑर्गनायझेशन करत आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाकडील पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागामार्फत २५ नोव्हेंबर २०२४ ते २८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत २१ वी पशुगणना सुरू आहे. त्याचे कामकाज ॲनिमल हेल्थ ऑर्गनायझेशन करत आहे. शासनाच्या विविध विकासाचे नियोजन, धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आणि दूध, अंडी व मांस या प्रमुख पशुजन्य पदार्थाच्या उत्पादनाची आकडेवारी तयार करण्यासाठी पशुगणना महत्त्वाची आहे.

त्यामुळे शहरातील घरगुती, संस्था व गोशाळा पशुमालकांकडील १६ प्रजातींपैकी (गाय वर्गीय, म्हैस वर्गीय, पशू, मेंढी, शेळी, डुक्कर, घोडा, शिंगरू, खेचर, गाढव, उंट, कुत्रा, ससा, हत्ती) व कुक्कुट (कोंबड्या, बदक, टर्की, इमू, क्वेल, गिनी, शहामृग) यांची प्रजाती, वयोगट व लिंगनिहाय आणि उपयोगानुसार गणना सुरू आहे. त्यासाठी ५० प्रगणक नियुक्त केले आहेत. त्यांना माहिती देऊन सहकार्य करण्याचे आवाहन महापालिकेने केले आहे.

महाराष्ट्र शासनाकडील पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागामार्फत २५ नोव्हेंबर २०२४ ते २८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत २१ वी पशुगणना करण्याचे कामकाज चालू केले आहे. सदरचे पशुगणनेचे कामकाज मे. ऍनिमल हेल्थ ऑरगोनायझेशन या संस्थेमार्फत सुरु आहे. शासनाच्या विविध विकासाचे नियोजन, धोरणात्मक निर्णय घेणेकामी तसेच दुध, अंडी व मांस या प्रमुख पशुजन्य पदार्थाच्या उत्पादनाची आकडेवारी तयार करणेसाठी पशुगणना महत्वाची आहे. जाती निहाय, वयोगट तसेच लिंगा निहाय व उपयोगानुसार ५० प्रगणकाकडे माहिती देऊन सहकार्य करणेबाबत महापालिकेमार्फत पशुपालकास आवाहन करण्यात येत आहे.



# पोलीस आयुक्तालयाने थकवले कोट्यवधींचे भाडे

## भाडे वसुलीसाठी महापालिकेचा पोलीस आयुक्तालयाकडे पाठपुरावा : पालिकेच्या 22 इमारती भाड्याने

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने पिंपरी-चिंचवड पोलिसांना 22 इमारती व मालमत्ता भाड्याने दिल्या आहेत. भाड्यापोटी पोलीस आयुक्तालयाकडून महापालिकेचे गेल्या 19 वर्षांपासूनचे तब्बल 7 कोटी 55 लाख 12 हजार रुपयांचे भाडे थकविले आहे. कर्तव्यदक्ष असलेला पोलीस विभाग किती शिस्तप्रिय हे यावरून उघड होत आहे.

पुणे शहर व ग्रामीण हद्दीतील पोलीस ठाणे मिळून नव्याने पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाची स्थापना करण्यात आली. शहरात 15 ऑगस्ट 2018 पासून नवीन आयुक्तालयाचे कामकाज सुरू झाले.

चिंचवडमधील प्रेमलोक पार्क येथील महापालिकेच्या महात्मा फुले शाळेची इमारत पोलिस आयुक्तालयासाठी भाडे तत्त्वावर देण्यात आली. एक जानेवारी 2019 पासून प्रेमलोक पार्क येथील नवीन इमारतीतून पोलिस आयुक्तालयाचे कामकाज सुरू आहे. शहराच्या विविध भागात पोलिस ठाण्यासाठी महापालिकेच्या मालमत्ता पोलिसांसाठी भाडेतत्त्वावर दिलेल्या आहेत.




### अनेक इमारती दिल्या भाड्याने

स्वतंत्र पोलीस आयुक्तालय सुरू झाल्यानंतर पोलिस आयुक्तांनी विविध कामकाजासाठी महापालिकेच्या इमारती भाडेतत्त्वावर देण्याबाबतची मागणी केली. त्यानुसार, पोलिस उपायुक्त परिमंडळ तीनच्या कार्यालयासाठी चिंचवड स्टेशन येथील प्रीमिअर प्लाझा येथील दोन मजली इमारत भाडे तत्त्वावर देण्यात आल्या आहेत. सांगवीतील भाजी मंडईसाठी विकसित केलेले गाळे सांगवी पोलिस ठाण्याच्या इमारतीसाठी देण्यात आले.

गांधीनगर, पिंपरीतील मेघाजी लोखंडे कामगार भवन, मोहननगर येथील बहुउद्देशीय इमारत, पिंपळे गुरवमधील राजमाता जिजाऊ उद्यानातील क्वॉटर्स, दिघी, वडमुखवाडी येथील जागाही पोलिसांच्या वाहतूक विभाग, गुन्हे युनिट शाखा या विविध विभागासाठी भाडे तत्त्वावर दिल्या आहेत.

पोलीस मुख्यालयासाठी निगडी येथील कै. अंकुश बोऱ्हाडे शाळेची इमारत तसेच, मोकळी जागाही दिली आहे. थेरगाव पोलिस चौकीसाठी महिला विकास केंद्राची इमारत अशा एकूण 22 इमारती व गाळे सन 2005 पासून पोलिसांना भाड्याने दिल्या आहेत. यामधील बहुतांशी मालमत्तांचा महापालिकेबरोबर करारनामाही करण्यात आलेले नाही. तेव्हापासून आजपर्यंत काही इमारत व गाळ्यांचे भाडे पोलिसांनी जमा केलेले नाही. गेल्या 19 वर्षांत पोलीस खात्याकडून महापालिकेचे 7 कोटी 55 लाख 12 हजार 852 रुपये भाडे थकविण्यात आलेले आहे.

### महापालिकेचा पोलीस आयुक्तालयाकडे पाठपुरावा

» पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयासह विविध पोलिस ठाणे व चौकी यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या 22 मालमत्ता पोलिसांना भाडे तत्त्वावर दिल्या आहेत. या भाड्यापोटी पोलिसांकडे 7 कोटी 55 लाख 12 हजार रुपयांची थकबाकी आहे. या थकबाकीसंदर्भात पोलिस विभागाशी सातत्याने संपर्क सुरू आहे, असे महापालिकेच्या भूमि आणि जिंदगी विभागाचे सहायक आयुक्त मुकेश कोळप यांनी सांगितले.

### कार्यालयाचे नाव थकबाकी

» पोलीस आयुक्तालय इमारत २ कोटी ६० लाख ५६ हजार
» दिघी पोलीस ठाणे १ कोटी ९१ लाख ३५ हजार
» वाहतूक शाखा, चापेकर चौक १ कोटी ३१ लाख ७ हजार
» पोलीस मुख्यालय, निगडी ६० लाख ४९ हजार
» थेरगाव पोलीस चौकी ३५ लाख २३ हजार
» पोलीस उपायुक्त, परिमंडळ- ३ १८ लाख ५६ हजार
» सांगवी पोलीस ठाणे १० लाख ६४ हजार
» गुन्हे युनिट -३, मोहननगर ८ लाख ९७ हजार

# चिंचवडमध्ये दुमदुमला 'मोरया मोरया'चा गजर

## श्रीमन् महासाधु श्रीमोरया गोसावी महाराज यांचा 463वा संजीवन समाधी सोहळा

**पिंपरी | प्रतिनिधी**

श्रीमन् महासाधु श्रीमोरया गोसावी महाराज यांच्या ४६३व्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त चिंचवड देवस्थान ट्रस्ट यांच्या वतीने श्री मोरया गोसावी महाराज यांच्या पदांवर आधारित 'माझ्या मोरयाचा धर्म जागो' या भक्तीगीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन श्रीमोरया गोसावी महाराज संजीवन समाधी मंदिर याठिकाणी करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरवातीला चिंचवड देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त जितेंद्र देव, विश्वस्त ॲड. राजेंद्र उमाप, विश्वस्त ॲड. देवराज डहाळे, स्वानंद मोकाशी यांच्या हस्ते गायक कलाकारांचा चिंचवड देवस्थान ट्रस्टच्या वतीने सन्मान करण्यात आला.




'माझ्या मोरयाचा धर्म जागो' या पदाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर 'तुज मागतो मी आता', 'मोरया तू जनक जननी; मोरया ही तुज विनवणी', 'माझ्या स्वामींचे भोगविलास रे; चला जाऊ पाहू मोरयास रे', 'माझी मयूर हीच पंढरी', 'मोरेश्वर गाव बरवा ठाव; तेथे नांदतो मोरया देव', खेळिया, 'पवनेच्या काठी संजीवन योगी; श्रीगणेशाचे भक्त मोरया गोसावी', 'मज सुख पावले हो', 'अहो थेऊर गाव तेथे देव चिंतामणी', 'सुखी नांदत होते मी संसारी', 'भीमा तटी स्थळभूमी सिद्धटेक', 'अजी आनंद आनंद' या श्री मोरया गोसावी महाराजांच्या पदांनी संपूर्ण वातावरण मोरयामय झाले होते. या पदांबरोबरच 'मल्हारवारी मोतीयाने द्यावी भरून; नाहीतर देवा जातो मी दुरून' आणि 'उदो ग अंबे उदो' या गाण्यांमधून यावेळी देवीचा जागर करण्यात आला.

या कार्यक्रमाचे संगीत संयोजन सुप्रसिद्ध संगीतकार प्रसन्न बाम, सागर दहिगावकर यांनी केले होते. तर अजित विसपुते, आशिष देशमुख, राधिका अत्रे यांनी गीतगायन केले. कोरसमध्ये नयना अंजनकर, तन्मय मोमीनकर, विजय खापेकर, जयवंत राजपुरे यांनी साथसंगत केली. तर बारसी वादन निलेश देशपांडे, तबल्याची साथ जयंत क्षीरसागर व अमित कुंटे, की-बोर्डची साथ मिहीर भडकमकर, विनीत तिकोणकर यांनी पखवाज व ढोलकीची साथ तर टाळ वाद्याची साथ अपूर्व द्रविड यांनी केली. तर या कार्यक्रमाच्या निवेदनाची जबाबदारी निरुपणकार राधिका अडीवरकर यांनी पार पाडली.

# स्वच्छ पुण्यासाठी महापालिका ‘आक्रमक’

## महापालिकेकडून शहरातील अस्वच्छता करणाऱ्या नागरिकांकडून तब्बल 40 लाखांचा दंड वसूल



**पुणे | प्रतिनिधी**

स्वच्छ पुणे सुंदर पुणे ठेवण्यासाठी एका बाजूला महापालिका दरवर्षी कोट्यवधीचा खर्च करत असली, तरी दरवर्षी जवळपास ४० ते ५० हजार नागरिकांकडून शहरात सार्वजनिक ठिकाणांसह शहरात वेगवेगळ्या प्रकारे कचरा करणे, तसेच नागरिकांच्या सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण होईल, असे कृत्य केले जाते. अशा नागरिकांवर महपालिकेकडून मागील काही वर्षांत कारवाईचा बडगा उगारण्यात आला असून, अशा अस्वच्छता करणाऱ्या नागरिकांवर केली जाणारी दंडात्मक करवाई जवळपास आठपटीने वाढली आहे.

२०२० मध्ये महापालिकेकडून शहरातील अस्वच्छता करणाऱ्या नागरिकांकडून तब्बल ४० लाखांचा दंड वसूल केला होता. हा दंडाचा आकडा २०२४ या वर्षात तब्बल ३ कोटी ७ लाखांच्या घरात पोहोचला आहे. विशेषत: मागील दोन वर्षांत महापालिकेने शहरात कारवाई वाढविली असल्याचे चित्र आहे. या दंडात्मक कारवाईमुळे अस्वच्छता करणाऱ्यांना चांगलीच जरब बसली आहे.

जानेवारी ते डिसेंबर २०२० – ४० लाख ६९ हजार

जानेवारी ते डिसेंबर २०२१ – ९६ लाख ५९ हजार

जानेवारी ते डिसेंबर २०२२ -१ कोटी १९ लाख ३५ हजार

जानेवारी ते डिसेंबर २०२३ – १ कोटी ६६ लाख ४६ हजार

जानेवारी ते डिसेंबर २०२४ – ३ कोटी ७ लाख ११ हजार

### स्वच्छतेसाठी उपविधी

» शहर स्वच्छतेसाठी महापालिकेकडून सार्वजनिक स्वच्छता उपविधी करण्यात आली आहे. त्यानुसार पालिकेकडून दंडात्मक कारवाईचे शुल्क निश्चित करण्यात आले आहे. या उपविधीची अंमलबजावणी गेल्या अडीच वर्षांपासून महापालिकेकडून मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे. या उपविधीनुसार सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे, कचरा जाळणे, सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणे, कचरा वर्गीकरण करून न देणे, बांधकामाचा राडारोडा टाकणे, बंदी असलेले प्लॅस्टिक वापरणे, पाळीवर प्राण्यांची शहरात अस्वच्छता करणे, कबुतरांना खाद्य टाकणे या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाते.

“ महापालिकेकडून शहर स्वच्छतेसाठी नागरिकांमध्ये जनजागृती केली जाते. तरीही नागरिक सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करतात. वारंवार सूचना देऊनही हा प्रकार कमी होत नसल्याने दंडात्मक कारवाई केली जाते. त्यासाठी प्रत्येक क्षेत्रीय कार्यालय स्तरावर स्वतंत्र पथके नेमली आहेत.

**- संदीप कदम, उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग.**

# कात्रज-कोंढवा रस्ता आता 84 मीटर होणार

## संपादनासाठी राज्य सरकारकडे आणखी 231 कोटी रूपयांची मागणी



**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेकडून कात्रज-कोंढवा ( खडीमशिन चौक) पर्यंत रस्ता रूंदीकरण करत हा रस्ता ८४ मीटर करण्याचे काम हाती घेण्यात आले होते. मात्र, रस्ता ८४ मीटर रूंद करण्यासाठी भूसंपादनास मोठ्या प्रमाणात निधी लागणार असल्याने महापालिकेने हा रस्ता ५० मीटर करण्याचा निर्णय घेत शासनाकडे या रस्त्यासाठी २०० कोटींची मागणी केली होती. मात्र, शासनाने केवळ १४० कोटींचा निधी पालिकेस दिला.

मात्र, आता अवघ्या दोन वर्षांतच महापालिकेने पुन्हा एकदा आपला निर्णय बदलला असून आता हा रस्ता पुन्हा ८४ मीटर केला जाणार आहे. यासाठी सुमारे तब्बल ९० हजार चौरस मिटर जागा ताब्यात घ्यावी लागणार आहे. त्याच्या भूसंपादनासाठी महापालिकेने आणखी २३१ कोटी रुपयांची मागणी राज्य सरकारकडे केल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी दिली.

महापालिकेकडून या रस्त्याचे काम मागील सहा वर्षांपासून सुरू आहे. हा चार किलोमीटरचा रस्ता करण्यासाठी पालिकेस भूसंपदानासाठी ७१० कोटींची गरज होती. मात्र, निधी अभावी पालिकेने अडीचशें कोटींच्या कामाची निविदा काढली. त्यानंतर कामासाठी जागाच नसल्याने हे काम रखडले. या रस्त्यावर अवजड वाहनांची वर्दळ अधिक असल्याने अनेक अपघात घडले आहेत त्यात काहींचे प्राण गेले असून अनेक जण जायबंदी झाले आहेत.

त्यामुळे महापालिकेने दोन वर्षांपूर्वी हा रस्ता ५० मीटरच रूंद करण्याचा निर्णय घेतला, त्यामुळे भूसंपदानाचा खर्च कमी होऊन तो २८० कोटी झाला. यामध्ये महापालिकेने ८० कोटींचा खर्च करण्याची तयारी दाखवित शासनाकडे २०० कोटींच्या निधीची मागणी केली. मात्र, शासनाने केवळ १४० कोटीच निधी दिला. त्यातून ५०० मीटर रस्त्यासाठी भूसंपादन सुरू आहे.

### रस्त्यासाठी केंद्रशसनाची मदत...

» दरम्यान, काही दिवसांपूर्वी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी कात्रज-कोंढवा रस्त्यासंदर्भात बैठक घेतली. त्यामध्ये महापालिकेने भूसंपादन करून द्यावे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणातर्फे रस्त्याचे काम केले जाईल, अशी सूचना केली आहे. त्यामुळे महापालिकेने आता संपूर्ण रस्ता ८४ मिटर रुंदीचा करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. ८४ मिटर रुंदीचा रस्ता करण्यासाठी महापालिकेला ९० हजार चौरस मिटर जागेची आवश्यकता आहे, त्यासाठी २३१ कोटी रुपये खर्च येणार आहे. ही रक्कम उपलब्ध व्हावी यासाठी प्रस्ताव पाठवला असल्याचे महापालिका आयुक्तांनी स्पष्ट केले.